Discount On New Stock
UP TO 50%
SALE!
SALE!
SHOE TRACK
Bapat Chowk, Library Road, Amravati

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
# हिंदुस्थान
७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे
www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

ऑफर ऑफर ऑफर
एक्सचेंज ऑफर
जुनी कोणतीही गादी आणा व नवीन गादीवर २०% सुट मिळवा
जावरकर फर्निशिंग
सतिधाम मंदिर
9422190292

■ वर्ष ७६ वे/अंक ३४८ वा ■ ■ अमरावती,बुधवार दिनांक ५ ऑगस्ट २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर १४ श्रावण १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■

विशेष संपादकीय

## अमरावतीतील गुन्हेगारी
## काल, आज आणि उद्याची भीषण चाहूल

ज्या शहरात कायद्याची भीती संपते, त्या शहरात गुन्हेगारांचे राज्य सुरू होते. ही उक्ती आज अमरावतीसारख्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या शहराच्या वास्तवाशी दुर्दैवाने जुळताना दिसत आहे. एकेकाळी शांत, सुरक्षित आणि सुसंस्कृत म्हणून ओळखले जाणारे अमरावती आज वाढत्या गुन्हेगारीमुळे चर्चेचा विषय बनले आहे. खून, लूटमार, चाकू हल्ले, महिलांवरील अत्याचार, अल्पवयीनांकडून होणारे गुन्हे, अंमली पदार्थांची तस्करी, सायबर फसवणूक, टोळी युद्ध, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि दिवसाढवळ्या होणाऱ्या गुन्ह्यांनी नागरिकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण केली आहे.

एकेकाळी अमरावतीच्या चौकांमध्ये रात्री उशिरापर्यंत नागरिक निर्धास्तपणे फिरत असत. महिलांना, विद्यार्थ्यांना किंवा ज्येष्ठ नागरिकांना भीती वाटत नव्हती. समाजात वडीलधाऱ्यांचा धाक, पोलिसांची दहशत आणि कायद्याचा आदर होता. गुन्हे घडत होते, पण त्यांचे प्रमाण कमी होते. समाजातील नैतिक मूल्ये, कौटुंबिक संस्कार आणि सामाजिक बांधिलकी मजबूत होती.

मात्र गेल्या काही वर्षांत चित्र झपाट्याने बदलले आहे. शहराचा विस्तार झाला, लोकसंख्या वाढली, बेरोजगारी वाढली, आर्थिक विषमता वाढली आणि त्याचबरोबर गुन्हेगारीचे स्वरूपही बदलले. पूर्वीचे गुन्हे हे वैयक्तिक वादांपुरते मर्यादित होते; आज गुन्हे संघटित पद्धतीने, आर्थिक फायद्यासाठी आणि समाजात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केले जात आहेत.

आज अमरावतीतील अनेक भागांमध्ये रात्रीच्या वेळी नागरिकांना बाहेर पडण्यास भीती वाटते. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. शाळा–महाविद्यालयांजवळ टवाळखोरांचे अड्डे, भरधाव वाहने, बेकायदेशीर रेसिंग, अंमली पदार्थांचे वाढते जाळे आणि सोशल मीडियावरून वाढणारे गुन्हे हे चिंतेचे विषय आहेत. अनेक गुन्हेगारांना कायद्याची भीती राहिलेली नाही, ही सर्वात धोकादायक बाब आहे.

गुन्हेगारी वाढण्यामागे अनेक कारणे आहेत. बेरोजगारी, व्यसनाधीनता, अंमली पदार्थांचा वाढता वापर, मोबाईल आणि सोशल मीडियाचा गैरवापर, पैशाची हव्यास, झटपट श्रीमंत होण्याची मानसिकता, कौटुंबिक विघटन, राजकीय हस्तक्षेप, न्यायप्रक्रियेतील विलंब आणि काही वेळा प्रभावी कारवाईचा अभाव ही त्यातील प्रमुख कारणे आहेत.

आज गुन्हेगारांना शिक्षा होण्यापेक्षा जामीन मिळण्याची खात्री जास्त वाटते. अनेक गुन्हेगार पुन्हा त्याच परिसरात दहशत निर्माण करतात. त्यामुळे सामान्य नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

सायबर गुन्ह्यांनी तर नवीन संकट निर्माण केले आहे. एका मोबाईल कॉलवर, एका लिंक्वर किंवा एका ओटीपीवर नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक होत आहे. वृद्ध, महिला, विद्यार्थी आणि व्यापारी हे सर्वच या जाळ्यात अडकत आहेत. तंत्रज्ञान जितके प्रगत झाले, तितकी गुन्हेगारीही अधिक आधुनिक झाली आहे.

अल्पवयीन गुन्हेगारांची वाढ ही आणखी एक चिंताजनक बाब आहे. चित्रपट, वेब सिरीज, सोशल मीडिया आणि हिंसक मनोरंजनाचा चुकीचा प्रभाव अनेक तरुणांवर पडत आहे. पालकांचा वेळ कमी, संस्कार कमी आणि मोबाईलचा वापर अधिक, या परिस्थितीत अनेक युवक चुकीच्या मार्गाकडे वळताना दिसत आहेत.

यासाठी केवळ पोलिसांना दोष देऊन चालणार नाही. समाज, पालक, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संघटना आणि नागरिक यांचीही तितकीच जबाबदारी आहे. पोलिसांनी गस्त वाढवणे, संवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा सक्षम करणे, अंमली पदार्थांविरोधात कठोर मोहीम राबवणे, टोळ्यांवर मोक्का व इतर कठोर कायद्यांतर्गत कारवाई करणे, सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करणे आणि गुन्हेगारांना राजकीय संरक्षण मिळणार नाही याची खात्री करणे अत्यंत आवश्यक आहे.

लोकप्रतिनिधींनी केवळ निवेदनांची भाषा न वापरता शहराच्या सुरक्षेसाठी ठोस धोरण आखणे आवश्यक आहे. प्रशासनाने विविध विभागांमध्ये समन्वय वाढवून गुन्हे रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. प्रत्येक चौकात कॅमेरे असून उपयोग नाही; त्या कॅमेऱ्यांवर सतत लक्ष ठेवणारी सक्षम यंत्रणा असणे गरजेचे आहे.

गुन्हेगारीवर नियंत्रणासाठी नागरिकांनीही पुढाकार घेतला पाहिजे. संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना देणे, परिसर सुरक्षा समित्या सक्रिय करणे, युवकांना क्रीडा, संस्कृती आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी करून घेणे, व्यसनमुक्ती मोहिमा राबवणे आणि मुलांमध्ये नैतिक शिक्षण रुजवणे ही काळाची गरज आहे.

आज प्रश्न केवळ गुन्हे वाढण्याचा नाही, तर समाजाची गुन्ह्यांबद्दलची संवेदनशीलता कमी होण्याचाही आहे. एखादा खून, चाकू हल्ला किंवा महिलांवरील अत्याचार ही बातमी काही तास चर्चेत राहते आणि नंतर विस्मरणात जाते. हीच उदासीनता गुन्हेगारांचे मनोबल वाढवते.

अमरावती ही संतांची, साहित्यिकांची, शिक्षणाची आणि संस्कृतीची भूमी आहे. या शहराची ओळख गुन्हेगारीने नव्हे, तर विकासाने आणि सुरक्षिततेने व्हावी, अशी प्रत्येक नागरिकाची अपेक्षा आहे. त्यासाठी कठोर कायद्याची अंमलबजावणी, जलद न्याय, राजकीय इच्छाशक्ती आणि समाजाचा सक्रिय सहभाग ही चार चाके मजबूत करावी लागतील.

आज अमरावती एका वळणावर उभी आहे. जर आजही प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि समाजाने जागे होऊन ठोस पावले उचलली नाहीत, तर उद्याचा इतिहास आपल्याला माफ करणार नाही. गुन्हेगारांना कायद्याची भीती आणि सामान्य नागरिकाला सुरक्षिततेची खात्री निर्माण करणे, हीच खरी सुशासनाची कसोटी आहे.

शेवटी एकच प्रश्न आहे अमरावतीत भीतीचे राज्य राहणार की कायद्याचे? याचे उत्तर आता कृतीतूनच द्यावे लागेल.

● विलास अरुण मराठे
अमरावती मो. ९८२३०७२७२७

## राज्यातील एसआयआर मोहिमेला दुसऱ्यांदा मुदतवाढ

मुंबई दि. ४ : राज्यातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचे वेळापत्रक केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी पुन्हा एकदा सुधारित केले आहे. या निर्णयानुसार बूथ लेव्हल ऑफिसर्स द्वारे केली जाणारी घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करण्याची मुदत ९ दिवसांनी वाढवून आता १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. परिणामी, राज्याची अंतिम मतदार यादी आता २७ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होणार आहे. निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयाने केलेल्या विनंतीनंतर निवडणूक आयोगाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

**सुधारित वेळापत्रक जाहीर**

नव्या वेळापत्रकानुसार, बूथ लेव्हल ऑफिसर १७ ऑगस्टपर्यंत मतदारांची घराघर जाऊन पडताळणी करणार आहेत. त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांना २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर या कालावधीत दावे आणि हरकती दाखल करता येणार आहेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांवर नोटिसा देणे, सुनावण्या घेणे आणि दावे-हरकतींचा निपटारा करण्याची प्रक्रिया २२ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण केली जाणार असून, २७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित केली जाईल.

**अधिकाऱ्यांना आणि राजकीय पक्षांना सूचना**

निवडणूक आयोगाने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना *(पान २ वर)*

## जलद गतीने न्याय मिळावा यासाठी नवीन न्यायालये स्थापन करणार
### सरकारने शेतकऱ्यांसाठी पेटारा उघडला, मंत्रिमंडळ बैठकीत ८ निर्णय

मुंबई दि. ४ : राज्य मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्याच्या विकासासाठी वेगवेगळ्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. तसेचस सध्या कोणकोणती कामे चालू आहेत, भविष्यात काय केले जाऊ शकते, यावरही मंथन झाले. दरम्यान, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीत शेतकऱ्यांशी निगडीत एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. तसे न्याय जलद गतीने मिळावा यासाठी नवीन न्यायालये स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.



**मंत्रिमंडळ निर्णय**

**कृषी विभाग**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेस आणखी तीन वर्षाची मुदतवाढ. आता योजनेत भूमिहीन शेतमजूर व महिला शेतकऱ्यांचा समावेश होणार. महिला शेतकरी सक्षमीकरण कायद्यामुळे दिलासा.

**ऊर्जा विभाग**

मुंबई शहरातील सर्व शासकीय कार्यालयांची व मुंबई महानगरपालिकांची वीज देयके बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमच्या (बेस्ट उपक्रम) संयुक्त बिलिंग प्रणालीद्वारे केंद्रीकृत पद्धतीने अदा केली जाणार. त्यासाठी प्रशासकीय सुधारणेस मान्यता.

**सामान्य प्रशासन विभाग**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोगात राज्य माहिती आयुक्त *(उर्वरित पान २ वर)*

## संसदेबाहेर राम मंदिर देणगी चोरीवर निदर्शने : खरगेंचा सवाल; ईडी कुठेय? रिजिजू म्हणाले; विरोधकांचे मगरीचे अश्रू; लोकसभा उद्यापर्यंत तहकूब


नवी दिल्ली दि. ४ : संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या १२ व्या दिवशी, राम मंदिरातील दानपेटीतील रक्कम चोरीला गेल्याच्या मुद्द्यावरून दोन्ही सभागृहांमध्ये मोठा गदारोळ झाला. मंगळवारी लोकसभेचे कामकाज केवळ १९ मिनिटे चालले. या काळात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर सुधारणांशी संबंधित विधेयके मांडली. त्यानंतर सभागृहाचे कामकाज बुधवारपर्यंत तहकूब करण्यात आले.




राज्यसभेचे कामकाज दिवसभरात दोनदा तहकूब करण्यात आले. सकाळी ११:०० वाजता कामकाज सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासाच्या आतच ते तहकूब करावे लागले. दुपारी १२:०० वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले, परंतु ते केवळ २० मिनिटे चालले. त्यानंतर दुपारी २:०० वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले.

तत्पूर्वी, राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यात खडाजंगी झाली. खर्गे यांनी सांगितले की, 'राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट'ची स्थापना केंद्र सरकारने केली होती आणि सरकारनेच या ट्रस्टला ७० एकरांहून *(पान २ वर)*

## पद्मश्री डी. वाय पाटील यांचे निधन
### शिक्षण अन् राजकीय वर्तुळात शोककळा



कोल्हापूर दि. ४ : 'शिक्षणसम्राट' आणि पद्मश्री डी. वाय पाटील यांचं निधन झालं. ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सोमवारी कोल्हापूरमध्ये त्यांची प्राणज्योत मालवली. ते गेल्या अनेक वर्षांपासून आजारी होते आणि त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. त्यांच्या निधनामुळे शिक्षण क्षेत्रात आणि राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे.

डी. वाय पाटील यांचे नाव ज्ञानदेव यशवंतराव पाटील असे होते. ते एक प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, समाजसेवक होते. शिक्षणसम्राट म्हणून त्यांची ओळख होती. बिहार, त्रिपुरा आणि पश्चिम बंगालचे ते माजी राज्यपाल *(उर्वरित पान २ वर)*

### माहोल....




अहो, संसदेत आपले नेते जी 'उच्च' पातळीची भाषा वापरतात, तीच आजची मुलं गल्लीत बोलत आहेत! आपण उगीच म्हणायचो पोरांना राजकारणात रस नाही; बघा, नेत्यांकडून भाषिक संस्कार किती पटपट शिकले!

## काँग्रेसकडून गुंगी गुडिया म्हणत सुनेत्रा पवारांवर टीका

मुंबई दि. ४ : राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बीड दौऱ्यातील एक व्हिडिओ व्हायरल करत काँग्रेसने सुनेत्रा पवार यांचा गुंगी गुडिया असा उल्लेख केला. सुनेत्रा पवारांवरील या टीकेनंतर राष्ट्रवादीने संताप व्यक्त केला असून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही काँग्रेसच्या वक्तव्यावरुन टीका केली. त्यानंतर, त्यांनी थेट काँग्रेसचे वरिष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना फोन करुन *(उर्वरित पान २ वर)*

### वेळ येऊ द्या मग....

मुंबई दि. ४ : काँग्रेसच्या पक्षाने सोशल मीडिया



खात्यावर एक व्हिडीओ पोस्ट करून खळबळ उडवून दिली आहे. या व्हिडीओमध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा गुंगी गुडिया असा उल्लेख *(उर्वरित पान २ वर)*













■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम